पीएच.डी., संशोधन आराखडा

"विठ्ठल उमप यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास"

कला विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास शोध प्रबंधाचा आराखडा सादर

संशोधक
राजा तुळशीराम कांबळे
(एम.ए. (मराठी), बी.पी.एड., नेट)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे
मराठी विभाग प्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

: संशोधन केंद्र :
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

एप्रिल - २०१९

अनुक्रमणिका

१) प्रस्तावना

२) उद्दिष्ट्ये

३) गृहितके

४) विषयाची व्याप्ती व मर्यादा

५) विषयाचे महत्त्व

६) संशोधन पद्धती

७) संशोधन आराखड्याचे प्रारूप

८) संदर्भ ग्रंथ सूची

१. प्रस्तावना :

शाहिरी वाङ्मयाचा उदय पेशवेकाळात झाला. शाहिरी वाङ्मयामध्ये लावणी आणि पोवाडे या वाङ्मय प्रकारांचा समावेश होतो. दलितांनी जोपासलेला आणि जतन केलेला हा वाङ्मयप्रकार आहे. लोकरंजन आणि लोकप्रबोधन करणे या उद्दिष्टांतून शाहिरी वाङ्मय जन्माला आला. लोकसंस्कृतीचा एक अमूल्य ठेवा जतन करण्याचे कार्य शाहिरी वाङ्मयाने केले. पूर्व परंपरेने चालत आलेल्या शाहिरी वाङ्मयाला आंबेडकरी शाहिरी वाङ्मयाने सामाजिकतेचा चेहरा दिला, स्वबद्दलचे आत्मभान लोकांमध्ये निर्माण केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णा भाऊ साठे, द.ना. गव्हाणकर, अमर शेख यांनी आपल्या शाहिरी लोकप्रबोधनाबरोबर लोकरंजन केले. यानंतर आंबेडकरी विचारांची ज्ञानगंगा उपेक्षित, गोरगरीब, अज्ञानी लोकांपर्यंत घेऊन जाऊन त्यांच्यात क्रांती निर्माण करण्याचे कार्य शाहिरीच्या माध्यमातून वामनदादा कर्डक आणि विठ्ठल उमप आदींनी केले. विठ्ठल उमप यांच्या जीवनकार्याची ओळख नवीन पिढीला करून देता यावी, त्यांच्या शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास करता यावा, यासाठी हा संशोधन विषय निवडला आहे.

२. उद्दिष्ट्ये :

१) विठ्ठल उमप यांचे जीवन कार्य अभ्यासणे.

२) आंबेडकरी चळवळीमध्ये विठ्ठल उमप यांचे योगदान तपासून पाहणे.

३) विठ्ठल उमप यांच्या जडणघडणीची प्रेरणा, प्रभाव यांचा अभ्यास करणे.

४) विठ्ठल उमप यांच्या शाहिरी वाङ्मयातील समाजप्रबोधनाचे वेगळेपण अभ्यासणे.

५) विठ्ठल उमप यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य तपासणे.

६) विठ्ठल उमप यांच्या शाहिरी वाङ्मयातील जीवन जाणिवा तपासून पाहणे.

३. गृहितके :

१) विठ्ठल उमप यांच्या जीवनसंघर्षाचा पट त्यांच्या साहित्यातून चित्रित झाला आहे.

२) तत्कालीन समाजवास्तवाचे दर्शन त्यांच्या वाङ्मयात घडते.

३) विठ्ठल उमप यांच्या साहित्यातून मानवी मूल्यांची रूजवणूक झाल्याचे दिसते.

४) विठ्ठल उमप यांच्या साहित्यात दलित जीवन जाणिवा चित्रित झालेल्या आहेत.

५) महानगरीय झोपडपट्टीचे दर्शन त्यांच्या आत्मकथनात घडते.

६) विठ्ठल उमप यांच्या शाहिरी वाङ्मयात आंबेडकरी विचारदर्शन घडते.

४. विषयाची व्याप्ती व मर्यादा :

शाहीर, कार्यकर्ता, प्रबोधनकार, लेखक म्हणून विठ्ठल उमप मोठे आहेत. त्यांचे नाव संपूर्ण देश आणि विदेशात सुपरिचित आहे. त्यांच्या समग्र साहित्याचा, शाहिरी वाङ्मयाचा तसेच आंबेडकरी चळवळीत विठ्ठल उमप यांचे योगदान, शाहिरी वाङ्मयाचा तुलनात्मक अभ्यास, शाहिरी वाङ्मयातील प्रबोधन अशा वेगवेगळ्या अंगाने त्यांच्या साहित्याचा अभ्यास करता येऊ शकतो. मी माझ्या संशोधनाचा विषय 'विठ्ठल उमप यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास' हा घेतलेला आहे. या अनुषंगानेच त्यांच्या जीवनकार्याचा पट संशोधनात सूक्ष्मपणे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न करायचा आहे हीच माझ्या संशोधनाची मर्यादा आहे.

५. विषयाचे महत्त्व :

विठ्ठल उमप यांच्या शाहिरी वाङ्मयाचे वेगळेपण, योगदान यांचा अभ्यास करावयाचा असून विठ्ठल उमप यांच्या समग्र साहित्याचा या संशोधनाच्या निमित्ताने अभ्यास करता येतो. तसेच आंबेडकरी चळवळीमध्ये विठ्ठल उमप यांच्या कार्याची माहिती मिळते. त्यांचे शाहिरी वाङ्मयात योगदान किती आहे याची जाणीव होते. तत्कालीन परिस्थितीची माहिती मिळते. त्यांनी केलेले प्रबोधनाचे कार्य समाजमन जोडणारे होते. त्यांच्या साहित्यातून त्यांचे जीवन आणि कार्य यांची माहिती मिळते. त्यांचे साहित्य जीवनमूल्यांबरोबर कलामूल्य जतन करणारे आहे. त्यांचे शाहिरी वाङ्मय समाजाला दृष्टी देते. समाजाच्या डोळ्यात प्रबोधनाचे अंजन लावून समाजमनाची दृष्टी बदलण्यासाठी विठ्ठल उमप आणि त्यांचे साहित्य खऱ्या अर्थाने उपकारक ठरते. ते अल्पशिक्षित असून साहित्यातील आत्मचरित्रात्मक, गझल, जांभूळ आख्यान, माझी वाणी भीमाचरणी, रंग शाहिरीचे असे साहित्य लिहून मराठी साहित्यात भर घातली आणि मराठी शाहिरी वाङ्मयाचा मळा आपल्या गळ्याने फुलवला तरीही ते आणि त्यांचे साहित्य दुर्लक्षित व उपेक्षित राहिले. माझ्या संशोधनाच्या अनुषंगाने त्यांचे साहित्य, चरित्र आणि त्यांच्या शाहिरी वाङ्मयाची ओळख नवीन पिढीला व्हावी ही महत्त्वाची भूमिका ठेवून मी हा विषय संशोधनासाठी घेतलेला आहे, हेच या विषयाचे महत्त्व आहे.

६. संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन करताना विविध पद्धतीचा आधार घेऊन संशोधन करावे लागणार आहे. एखाद्या विषयाचा विविध पद्धतीने अभ्यास केल्यास त्या विषयाला चांगल्या प्रकारे न्याय देता येतो. त्यासाठी प्रस्तुत संशोधन करताना चरित्रात्मक, समाजशास्त्रीय, ऐतिहासिक, मार्क्सवादी, मानसशास्त्रीय, सौंदर्यवादी, आंबेडकरवादी, तुलनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे.

७. संशोधन आराखड्याचे प्रारूप

विठ्ठल उमप यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास

प्रकरण पहिले - विठ्ठल उमप जीवन आणि कार्य

सदरील विषयाचे संशोधन करताना संशोधनाचे पहिले प्रकरण विठ्ठल उमप जीवन आणि कार्य हे असून या प्रकरणामध्ये त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण, प्रेरणा, प्रभाव, संस्कार, जडणघडण, वैवाहिक जीवन, तत्कालीन परिस्थिती, आंबेडकरी चळवळीतील अनुभव, योगदान यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - 'फु बाई फु' या आत्मकथनाचे स्वरूप

सदरील विषयाचे संशोधन करताना दुसरे प्रकरण 'फु बाई फु' या आत्मकथनाचे स्वरूप हे असून या प्रकरणामध्ये आत्मकथन म्हणजे काय? आत्मकथनाची वैशिष्ट्ये, प्रेरणा, त्यातील दलित जीवनाचे चित्रण, अस्पृश्यतेचे दर्शन, दलित, दारिद्र्याचे चित्रण, संघर्ष चित्रण, झोपडपट्टीचे चित्रण, 'स्व' ची जाणीव आत्मकथनातील वाङ्मयीन विशेष, 'फु बाई फु' मधील जीवनाचे वास्तव दर्शन, व्यक्तिदर्शन, आत्मकथनातील घटना प्रसंग इ. घटकांच्या आधारे या प्रकरणाचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे - 'उमाळा' गझलसंग्रहातील समाज जाणिवा

उपरोक्त प्रकरणामध्ये गझल म्हणजे काय, गझल वाङ्मयाची परंपरा परंपरा, प्रभाव, व्याख्या, सामाजिक जाणिवा, प्रेमजाणिवा, स्त्री जाणीव, संघर्ष, दारिद्र्य, अस्पृश्यतेचे चित्रण, लोकप्रबोधन, महापुरुषांचे दर्शन, वाङ्मयीन विशेष इत्यादी घटकांच्या आधारे या प्रकरणाचा अभ्यास करावयाचे आहे.

प्रकरण चौथे - विठ्ठल उमप यांचे लोकगीतातील प्रबोधन

सदरील विषयाचे संशोधन करताना प्रकरण चौथे विठ्ठल उमप यांचे लोकगीतातील प्रबोधन हे असून या प्रकरणामध्ये लोकगीत म्हणजे काय, प्रबोधन म्हणजे काय, आंबेडकरांची गीते, कोळीगीते, लोकगीत, समाजप्रबोधनपर गीत,

गीतांचे स्वरूप, विशेष या घटकांच्या आधारे या प्रकरणांचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण पाचवे - विठ्ठल उमप यांच्या साहित्याचे विशेष

संशोधनाच्या पाचव्या प्रकरणात विठ्ठल उमप यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष, त्यांच्या साहित्याचे विशेष, व्यक्तिरेखा, वर्णनकौशल्य, घटना-प्रसंगाचे चित्रण, भाषा कौशल्य, संवाद कौशल्य, अभिनय सादृश्यता, सादरीकरणाचे कौशल्य, नाट्यात्मकता, गेयता, संगीत सादृश्यता, कथनात्मकता, लोकप्रबोधन, वक्रोक्ती, लोकजीवन दर्शन, लोकरंजन, प्रतिक, प्रतिमा यांचा शोध घ्यावयाचा आहे.

प्रकरण सहावे - विठ्ठल उमप यांच्या वाङ्मयाचे निष्कर्षात्मक विवेचन

प्रकरण एक ते पाचमध्ये संशोधनांती जे निष्कर्ष हाती येतील ते या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत.

परिशिष्ट्ये

संदर्भ ग्रंथ सूची

१) दलित शाहिरी वाङ्मय - डॉ.कृष्णा किरवले

२) अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय - दत्तू मल्लू पाटील

३) शाहीर अमर अण्णा - डॉ.माधव पोतदार

४) लोकरंगनायक विठ्ठल उमप - प्रा.सुरेश चौथाईवाले

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे
मराठी विभाग प्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय,उदगीर

संशोधक
राजा तुळशीराम कांबळे